Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

28th January 2019 Special Issue – 106

# The Changing Role of the Welfare State in the Last Two Decades

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
GV'S Arts & Commerce college,
eola, Dist. Nashik (M.s.) India

Executive Editor of This Issue
Dr. A.M. More
Dept. of Economics
Vasundhara College, Ghatnandur,
Tq. Ambajogai, Dist. Beed

31. शासन आणि कल्याणकारी योजना 112
**प्रा.डॉ. सांगळे भगवान श्रीपती**

32. भारतीय कृषी अर्थव्यवस्था आणि विकास योजना 116
**प्रा.डॉ.अंबादास पांडुरंग बर्वे**

33. भारतातील शेती व्यवस्था 118
**डॉ.सुभाष प्रभू राठोड**

34. कामगार कायदे आणि शासन 121
**प्रा. डॉ. ढास डी.के.**

35. शासन आणि कामगार कायदे 125
**प्रा.किर्दंत विलास गोपीनाथराव**

36. शासन आणि बदलते बँकिंग - एक दृष्टिक्षेप 127
**प्रा. डॉ. अनंत नरवडे**

37. **महाराष्ट्रातील रेशीम शेतीचा अभ्यास** 130
डॉ. ज्ञानेश्वर जिगे

38. भारताच्या तेलबिया उत्पानात सरकारची भूमिका 132
**प्रा.डॉ.शिवाजी पाते**

39. कल्याणकारी राज्य आणि महाराष्ट्रातील सिंचन व कोरडवाहू क्षेत्र विकासाच्या योजना 135
**पाटील संतोष बालाजी , डॉ.कोरपकवाड ई.डी.**

40. आदिवासी जमात व शासनाच्या कल्याणकारी योजना 138
प्रा. डॉ. संजय सुरेवाड

41. भारतीय शेती आणि शासन 140
**प्रा. गोविंद रामराव काळे**

42. अगदी अलीकडील सरकारच्या कल्याणकारी योजना 142
**डॉ. प्रमोद बालाजीराव बेरळीकर**

43. भारतीय कृषी विकासात शासकीय उपक्रमांचा सहभाग 145
**प्रा.श्रीमंत तुकाराम कावळे**

44. शासन आणि शेती संबंधी योजना 148
प्रा. **चौधरी शाम अंकुशराव**

45. महाराष्ट्रातील शेतीची वास्तविकता व शासकीय दृष्टीकोन 150
डॉ.दीपक एम.भारती , **मेघराज जनार्धन मोरे**

46. शासनाच्या कल्याणकारी योजनांचा आढावा 153
प्रा.मकरंद जोगदंड , डॉ.अरुण दळवे

**RESEARCH JOURNEY** International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue - 106 | January 2019 | UGC Approved No. 40705
The Changing Role of the Welfare State in the Last Two Decades

# अगदी अलीकडील सरकारच्या कल्याणकारी योजना

**डॉ. प्रमोद बालाजीराव बेरळीकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

**प्रस्तावना :-**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने अनेक कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली. सरकारने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारून जनतेसाठी अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. मोफत शिक्षण, सवलतीच्या दरात सोई पुरविणे, बेकारी भत्ता, रोजगारनिर्मितीच्या योजना, महिला व बालविकासाच्या योजना सरकारने सुरू केल्या. बेकारी, दारिद्र्य याचबरोबर दुष्काळ, आरोग्य ह्या समस्या दूर करणे देखील महत्त्वाचे आहे. त्या अनुषंगाने गेल्या काही वर्षात सरकारने ज्या कल्याणकारी योजना राबविलेल्या आहेत. त्याचा आढावा घेतला आहे.

**गृहितके :-**

अगदी अलीकडील सरकारच्या कल्याणकारी योजना हा शोध निबंध लिहिण्यासाठी पुढील गृहितके गृहित धरलेली आहेत.

1) ग्रामीण विकासात शासनाची भूमिका महत्त्वाची आहे.
2) कल्याणकारी योजनाच्या अंमलबजावणीमुळे विकासाला चालना मिळत आहे.
3) आरोग्य, आवास, दुष्काळ अशा समस्या कल्याणकारी योजनाच्या अंमलबजावणीमुळे कमी होत आहेत.

**संशोधन पध्दती व संशोधनाची साधने :-**

अगदी अलीकडील सरकारच्या कल्याणकारी योजना हा शोधनिबंध लिहिताना द्वितीयक साधन सामुग्रीचा वापर केला आहे. पुस्तके, संदर्भ ग्रंथ, इंटरनेटवरून प्राप्त झालेली माहिती, वर्तमानपत्रे, मासिकातून प्राप्त झालेली माहिती लिखानासाठी वापरलेली आहे व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर लिखाणासाठी केला आहे.

**अगदी अलीकडील कल्याणकारी योजना :-**

**1) जलयुक्त शिवार अभियान- महाराष्ट्र :-** महाराष्ट्राला सतत दुष्काळाचा सामना करावा लागतो. दुष्काळावर कायम स्वरूपी मात करण्यासाठी सरकारने जलयुक्त शिवार अभियान हातात घेतले आहे. या योजनेमध्ये जलसंधारणाच्या ज्या वेगवेगळ्या योजना आहेत. त्या सर्व योजनाचे एकत्रीकरण करण्यात आले. गावाच्या शिवारातील पाणी गावातच साठवून भूपृष्ठावरील आणि भूगर्भातील जलपातळी वाढण्यास या योजनेचा मोठा हातभार लागणार आहे. या योजनेचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

**जलयुक्त शिवार अभियानाचे काही प्रमुख उद्देश :-**

1) गावाच्या शिवारात पावसाचे पाणी अडविणे.
2) भूगर्भातील पाणी पातळीत वाढ करणे.
3) राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करून शेतीसाठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे.
4) जलस्त्रोतातील गाळ लोकसहभागातून काढून पाणीसाठा वाढविणे.
5) अस्तित्वात असलेले व निकामी झालेले बंधारे, गावतलाव, पाझर तलाव, सिमेंट बंधारे आदि जलस्त्रोतांची साठवण क्षमता वाढविणे.

पाण्याचा पडणारा थेंब अन् थेंब अडवायचा, साठवायचा व त्याच ठिकाणी जिरवायचा. पिण्याच्या व वापरावयाच्या पाण्यासाठी पाण्याचे विकेंद्रीत साठे त्या त्या गावात निर्माण करायचे. जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत कंपार्टमेंट बंडिंग, ढाळीचे बांध, सलग समतल चर, खोल सलग समतल चर, माती नाला बांध, साखळी सिमेंट नाला बांध, सिमेंट नाला बांध दुरूस्ती, के.टी.वेअर दुरूस्ती, पाझर तलाव दुरूस्ती, गाव तलाव, नाला सरळीकरण, खोलीकरण, गाळ काढणे, शेततळे, ओढा जोड प्रकल्प, विहीर/बोअर पुनर्भरण, रिचार्ज शाफ्ट, ठिबक सिंचन, तुषार सिंचन या सर्व योजनाचे एकत्रीकरण करण्यात आले.

**कोष्टक क्रमांक 1**
**महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय 10 जुलै 2015 पर्यंतची कामे**

| अ.क्र. | जिल्हा | निवडलेली गावे | लोकसहभागातून कामे सुरू झालेली गावे | कामाची अंदाजित रक्कम (कोटी) |
|---|---|---|---|---|
| 1 | अहमदनगर | 279 | 279 | 2.59 |
| 2 | धुळे | 129 | 26 | 4.56 |
| 3 | जळगाव | 232 | 71 | 5.47 |
| 4 | नंदुरबार | 72 | 70 | 1.4 |
| 5 | नाशिक | 229 | 128 | 11.89 |
| 6 | अमरावती | 253 | 22 | 1.59 |
| 7 | अकोला | 200 | 117 | 26.64 |
| 8 | बुलढाणा | 330 | 206 | 15.24 |
| 9 | वाशिम | 220 | 68 | 3.33 |
| 10 | यवतमाळ | 413 | 46 | 5.46 |
| 11 | नागपूर | 313 | 134 | 0.06 |
| 12 | भंडारा | 86 | 86 | -- |

| अ.क्र. | जिल्हा | निवडलेली गावे | लोकसहभागातून कामे सुरू झालेली गावे | कामाची अंदाजित रक्कम (कोटी) |
|---|---|---|---|---|
| 13 | गोंदिया | 94 | 52 | 5.03 |
| 14 | चंद्रपूर | 218 | 30 | -- |
| 15 | गडचिरोली | 152 | 58 | 0.69 |
| 16 | वर्धा | 214 | 24 | 0.57 |
| 17 | सातारा | 215 | 153 | 4.81 |
| 18 | सांगली | 141 | 93 | 1.78 |
| 19 | सोलापूर | 280 | 280 | 27.5 |
| 20 | कोल्हापूर | 69 | 69 | 0.0005 |
| 21 | ठाणे | 26 | 0 | -- |
| 22 | पालघर | 50 | 25 | 0.5943 |
| 23 | रायगड | 45 | 01 | 0.5943 |
| 24 | रत्नागिरी | 47 | 47 | 0.003 |
| 25 | सिंधुदुर्ग | 35 | 9 | 0.0705 |
| 26 | औरंगाबाद | 228 | 135 | 18.11 |
| 27 | जालना | 209 | 90 | 3.8 |
| 28 | बीड | 271 | 22 | 5.66 |
| 29 | परभणी | 170 | 115 | 7.5 |
| 30 | हिंगोली | 124 | 34 | 4.22 |
| 31 | नांदेड | 261 | 85 | 15.97 |
| 32 | लातूर | 202 | 162 | 47.85 |
| 33 | उस्मानाबाद | 218 | 130 | 10.48 |
| | **एकूण** | **6202** | **3993** | **253.9311** |

(लोकराज्य, ऑगस्ट-2015)

वरील कोष्टकात 10 जुलै 2015 पर्यंत महाराष्ट्रात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत 33 जिल्ह्यात एकूण 6202 गावे निवडली गेली. तर लोकसहभागातून सुरू झालेल्या गावाची संख्या 3993 इतकी होती. कामाची अंदाजीत रक्कम 253.93 कोटी इतकी होती.

**2) पंतप्रधान आवास योजना :-** अन्न, वस्त्र आणि निवारा या प्रामुख्याने मानवाच्या मुलभूत गरजा आहे. सर्वांना हक्काचे घर मिळावे म्हणून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिनांक 20 नोव्हेंबर 2016 ला आग्रा, उत्तरप्रदेश येथे सुरू केली. ही योजना प्रामुख्याने दोन विभागात वर्गीकृत केली आहे. एक म्हणजे प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना व प्रधानमंत्री शहरी आवास योजना होय. ग्रामीण आवास योजनेअंतर्गत 2016-17, 2017-18 व 2018-19 या तीन वर्षात ग्रामीण भागात 1 कोटी घरकुले बांधण्यात येणार आहेत. पुर्वीची मदत रू. 70,000 वरून आता ती रू. 1.20 लाख केली आहे. दुर्गम आदिवासी भागात ही रक्कम रू. 1.30 लाख दिली जाते. रक्कम सरळ लाभार्थीच्या बँक खात्यात जमा केली जाते.

शहरी भागात नागरी दारिद्र्य निर्मुलन योजनेचा भाग म्हणून पंतप्रधान आवास योजना नागरी हा कार्यक्रम राबविला जातो. या अभियानांतर्गत शहरातील गरिबांसाठी झोपडपट्ट्यातील लोकांना मदत दिली जाते. या अभियानाचा मुख्य उद्देश 2022 पर्यंत आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण होणार आहेत. सर्वांना निवास मिळण्याची तरतूद केली जाईल.

**3) स्वच्छ भारत अभियान :-** महात्मा गांधीच्या 150 व्या जयंती शताब्दीनिमित्त स्वच्छ भारत हीच त्यांना योग्य आदरांजली ठरेल असे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीनी राजपथ नवी दिल्ली येथे 2 ऑक्टोबर 2014 रोजी स्वच्छ भारत अभियानाची सुरूवात करताना म्हटले. स्वच्छ भारत अभियानाला देशव्यापी चळवळीचे स्वरूप देण्यात आले. पंतप्रधानांनी स्वत:च्या उक्ती व कृतीतून जनतेला स्वच्छ भारत अभियानाचा संदेश दिला आहे. स्वच्छता अभियानाची सुरूवात गंगा नदीच्या अस्सी घाटावर झाली.

स्वच्छतेसाठीच्या या जनचळवळीमध्ये समाजातील सर्व स्तरावरील लोकांचा सहभाग होता. सरकारी कर्मचारी, लष्करी जवान, सिने कलाकार, खेळाडू, उद्योजक, अध्यात्मिक गुरु सर्वजन या कार्यासाठी पुढे सरसावले. स्वच्छता अभियानासाठी देशभरात विभिन्न सरकारी विभाग, अशासकीय संस्था व स्थानिक समाज केंद्रानी आयोजित केलेल्या उपक्रमात लाखो लोकांनी सहभाग घेतला.

**4) प्रधानमंत्री उज्ज्वला योजना :-** दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या पाच कोटी कुटुंबाना घरगुती गॅस देण्याच्या उद्देशाने प्रधानमंत्री उज्ज्वला योजना केंद्र सरकारने सुरू केलेली आजही ग्रामीण भागात अनेक महिला स्वयंपाक करण्यासाठी लाकडी जळण वापरतात. बऱ्याच वेळा लाकडी धुरामुळे बालकाना आणि महिलाना श्वासच्छोवासाच्या तक्रारी येतात. अस्वच्छ जळन वापरल्यामुळे बऱ्याच महिलांचे मृत्यू सुध्दा होतात. घ्रधानमंत्री उज्ज्वला योजनाङ ही भारत सरकारची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी द्वारे सन 2016 मध्ये सुरू केलेली कल्याणकारी योजना आहे. 21 जुलै 2016 च्या आकडेवारी नुसार सुमारे 17,66254 जोडण्या लाभार्थ्यांना दिल्या गेल्या. 2020 पर्यंत देशातील 10 कोटी पेक्षा अधिक कुटुंबांना जे दारिद्र्य रेषेच्या खाली आहेत. त्यांना या योजनेअंतर्गत घरगुती गॅस उपलब्धता करून देण्याचा उद्देश आहे.

**5) दीनदयाळ उपाध्याय (ग्राम ज्योती योजना) :-** संपूर्ण भारतात वीजेचा पुरवठा करण्यासाठी नोव्हेंबर 2014 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या योजनेची घोषणा केली. सरकारने 1 मे 2018 पर्यंत 18,452 गावात ज्या गावात वीज नाही अशा गावात वीजेचा पुरवठा करण्याचे निश्चित केले. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत वीजेची भूमिका महत्त्वाची आहे. या योजनेअंतर्गत सर्व गावातील घराचे विद्युतीकरण केले जाईल. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातील. या योजनेच्या सुरूवातीमुळे आरोग्य, शिक्षण, बँकींग, ए.टी.एम. सेवा यामध्ये सुधारणा होईल. ग्रामीण भागात रेडिओ, टेलीफोन, टेलीव्हिजन, इंटरनेट आणि मोबाईल इत्यादी साधने लवकर पोहचतील. वीजेच्या उपलब्धतेमुळे सामाजिक सुरक्षितेत सुधारणा होईल. शाळा, पंचायती, दवाखाने, पोलीस स्टेशनमध्ये वीजेचा पुरवठा होईल. या योजनेत 43033 कोटी रुपये गुंतवणूक केली जाणार आहे. सर्व खेडेगावाचे विद्युतीकरण घडवून आणणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. मुख्य विद्युत वाहिनीपासून शेतकऱ्यांच्या घरगुती विद्युत वाहिनीचे विलगीकरण ज्या द्वारा शेतकऱ्यांना पुरेसा विद्युत पुरवठा करता येईल. उप-पारेषण तसेच वितरण जाळ्यास बळकटी देऊन विद्युत पुरवठ्याचा दर्जा आणि विश्वासार्हता वाढविणे हा ही या योजनेचा उद्देश आहे. तसेच योग्य मापनाने वीज गळती रोखणे हा ही योजनेचा उद्देश आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमुळे विद्युत सेवा खात्रीने ग्रामीण भागात पोहचेल. ग्रामीण भागाच्या सर्वसमावेशक विकासाला सुनिश्चित प्राप्त होईल.

**शोधनिबंधाचे निष्कर्ष :-**

1) सरकारी योजनेच्या माध्यमातून कल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहचत आहेत.
2) कल्याणकारी योजनाच्या अंमलबजावणीमुळे विकासाला चालना मिळत आहे.
3) जलयुक्त शिवार योजनेमुळे काही प्रमाणात का होईना भुजलपातळी वाढण्यास मदत होत आहे.
4) पंतप्रधान आवास योजनेमुळे लोकांना हक्काची घरे प्राप्त आहेत.
5) उज्ज्वला गॅस योजनेमुळे दारिद्र्य रेषेखालील लोकांना गॅसची सुविधा प्राप्त होत आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) Economic Survey 2017-18
२) ग्रामीण अर्थशास्त्र- डॉ. प्रमोद बेरळीकर आणि डॉ. राजश्री जाधव